**महाराष्ट्र शासन**

**संचालक**

**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृ.आ. म.रा. पुणे-1**

**दूरध्वनी क्रमांक- 02026122611फॅकस क्र. 02026055322 ई-मेल- jdasoil@rediffmail.com**

---

## आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना-सन 2017-18
## मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना-** राज्यात जलसंधारण कार्यक्रमातंर्गत 30 जानेवारी 1996 पासून एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यास सुरूवात झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधीतून आदिवासी लाभार्थ्यांच्या शेतावर मृद व जलसंधारणाचे विविध उपचार राबविण्यात येत आहेत. आदिवासी शेतक-यांना उत्पन्नाचे इतर कायम स्वरुपी साधन नसते. त्यांचे संपूर्ण क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठीच्या मर्यादा लक्षात घेता त्यांच्या कृषि उत्पन्नात वाढ करण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा निर्णायक स्वरुपी कार्यक्रम राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

योजनेचा **उद्देश-** आदिवासी शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे राहणीमान सुधारणे व त्यांचे स्थलांतर रोखणे, यासाठी शाश्वत निधी उपलब्ध करुन देणे असून राज्यातील शासनाने निश्चित करुन दिलेल्या जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निधीसाठी जिल्हयाची निवड करण्यात आली आहे.

कृषि विकासाचा दर 4 टक्के करणे अभिप्रेत असून त्यासाठी केंद्र/राज्य शासनाने केलेल्या अनेक उपाययोजनेत मृद व जलसंधारण योजनेस महत्व देण्यात आलेले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक असक-2007/प्र.क्र.121/जल-7 दिनांक

30.11.2007 नुसार राज्यातील अपूर्ण पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यासाठी एक धडक मोहीम हाती घेवून " गतिमान पाणलोट " विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. सन 2007-08 ते सन 2016-17 पर्यंत राज्यस्तरीय सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांपैकी अपूर्ण असलेले पाणलोट पुर्ण करण्यासाठी व प्राधान्याने जलयुक्त शिवार योजनेतंर्गत आदिवासी जिल्हयातील (अधिसूचित) निवडलेल्या गावामध्ये आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधीतून मृद संधारणाच्या कामासाठी सदरचा निधी वापरण्यात यावा. यासाठी उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी शेतक-यांच्या क्षेत्रावर खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील (ओटीएसपी) क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी शेतक-यांच्या क्षेत्रावर खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेअंतर्गत केलेली तरतूद सर्वसाधारण योजनेखाली खर्च करण्यात येवू नये.मा. जिल्हाधिकारी हे जिल्हा योजनांचे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतात. सन 2017-18 मध्ये सदर कार्यक्रम अंमलबजावणीसाठीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

**अ) पाणलोट व गांव निवड**

1) प्राधान्याने ज्या सुक्ष्म पाणलोटांमध्ये आदिवासी शेतक-यांचे क्षेत्र आहे त्या अधिसूचित आदिवासी क्षेत्रातील सुक्ष्म पाणलोट व गांवे निवडावीत.

2) सदरचे पाणलोट क्षेत्र विकसीत होण्यामुळे आदिवासी शेतक-यांना दृष्य स्वरुपात लाभ होईल असे क्षेत्र निवडावे.

3) पाण्याचे दुर्भिक्ष असलेले, टँकरफेड, दुर्गम, मागासलेले असे पाणलोट क्षेत्र प्राधान्याने निवडावे.

4) आदिवासी क्षेत्रातील/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत आदिवासी शेतकरी मृद व

जलसंधारण योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

5) सदर योजनेतून उपलब्ध होणा-या निधीतून जास्तीत जास्त अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्याचे जिल्हास्तरावर नियोजन करावे.

6) अधिसूचित आदिवासी क्षेत्रातील गावामधील जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या पाणलोटांना प्रथम प्राधान्याने निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा.

7) राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी अशा जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोटांत समाविष्ट असलेल्या आदिवासी लाभार्थ्यांची संमती घेवून त्यांचे क्षेत्रावर वैयक्तिक व सार्वजनिक मृद व जल संधारणाचे खालील प्रमाणे उपचार घेण्यात यावेत.

**क्षेत्र उपचार** :- सलग समतल चर, खोल सलग समतल चर, लुज बोल्डर, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बंडींग, शेततळे, मजगी, पडकई, जुनी भात शेती दुरुस्ती इ.

**नाला उपचार:-** लहान माती नालाबांध, अनघड दगडांचे बांध, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, वळण बंधारे इ.

8) अधिसूचित आदिवासी क्षेत्रातील गावामधील जलयुक्त शिवार अभियानातील निवड केलेल्या गावात आदिवासी क्षेत्रातील/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत वैयक्तिक लाभाची जास्तीत जास्त क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करावीत. सार्वजनिक उपचाराची कामे प्रस्तावित करतांना संबधित प्रवर्गातील लाभार्थिचे क्लस्टर निवडून सदर उपचार घेण्यात यावेत. त्यामध्ये सदर उपचारांचे चोहोबाजूंनी 250 मी. अंतरापर्यंत संबधित प्रवर्गातील किमान 2 लाभार्थींची शेतजमीन असणे बंधनकारक राहील. या संवर्गातील लाभार्थींची शेती तुरळक व विखुरलेल्या स्वरुपात राहते. सदरचे लाभार्थी वंचित न राहता यांना लाभ होवून उन्नती साधता यावी हा हेतू ठेवून व अशा उपचारांमध्ये आदिवासी

क्षेत्रातील/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेतील  निधी अखर्चित राहणार नाही तसेच लाभार्थी वंचित राहू नयेत याची दक्षता घ्यावी.

**ब) अंमलबजावणी**

1) या योजनेची अंमलबजावणी करतांना जलसंधारण विभागाचा मजूरांमार्फत  दि. 10/10/2013 व मशिनरीमार्फत  दि. 15/10/2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार मृद संधारण उपचारांसाठी निश्चित केलेले आर्थिक मापदंड विचारात घ्यावेत.

2) पाणलोटातील प्रस्तावित क्षेत्र उपचाराच्या बाबींसाठी जागा निवड, सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे या सर्व बाबी मृद संधारण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सुचनांनुसार अंमलात आणाव्यात. मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेनंतर मा.जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजूरी घेवून कामे करावीत. ओघळ नियंत्रणाच्या माती नालाबांधाच्या जागांची निवड तालुका कृषि अधिकारी व सिमेंट नालाबांधाच्या उपचारासाठी शासन निर्णय दिनांक 23/6/2017 या नुसार कार्यवाही करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

3) या योजनेच्या सर्व निधी स्त्रोतातून मृद व जलसंधारणाची रु. 3.00 लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची कामे करतांना ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा. यासाठी कृषि आुक्तालयाने निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. मृदस/मृद-6/ई-निविदा/1060/2015 दि. 25/5/2015 अन्वये व त्यानंतर या प्रकरणी आयुक्तालय स्तरावरुन वेळोवेळी दिलेल्या सूचनांचा अवलंब करावा.

4) निधी खर्च करतांना आदिवासी विकास विभागाच्या निधी विनियोगा बाबतच्या प्रचलित अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करावे.

5) सदरहू निधी सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी वितरीत करण्यात येत असून तो या वर्षातच अपुर्ण असलेली पाणलोटात खर्च करण्यात यावा व मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

6) निवड करण्यात आलेल्या पाणलोटातील उपचारांना निधी उपलब्धतेनुसार तांत्रिक मान्यता घेवून प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावेत. मा. जिल्हाधिकारी यांनी त्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करावी.

वरील अटींच्या पुर्ततेस अधिन राहून या योजनेखाली मंजूर तरतूदीतून कामावरील खर्च भागविण्यात यावा.

**क) निधीची उपलब्धता**

1. कार्यक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च सन 2017-18 मध्ये मंजूर केलेल्या जिल्हास्तरावरील निधीतून भागविण्यात यावा. यासाठी जिल्हयातील निवडलेल्या सर्व पाणलोटांसाठी आवश्यक रक्कम प्रथम निश्चित करावी. त्यानंतर सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी जिल्हयास टीएसपी/ओटीएसपी योजनेतून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे पाणलोट निहाय व लाभार्थीनिहाय नियोजन करण्यात यावे. सन 2017-18 साठीच्या जिल्हानिहाय अर्थसंकल्पीय तरतूदी सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

**ड) कामाचे सनियंत्रण**

सदर योजनेअंतर्गत पाणलोटातील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. मात्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील. यासाठी उपविभागीय कृषि

अधिकारी यांनी  टीएसपी/ओटीएसपी योजनेच्या निधीतून झालेल्या पाणलोटांना भेट देवून कामाचे नियोजन आणि सुरु असलेल्या कामांची गुणवत्ता तपासणी अनिवार्य करण्यात येत आहे. त्यांच्या भेटीची टिपणी त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना त्वरीत सादर करावी. निवडलेल्या पाणलोटातील कामाच्या नियोजन, गुणवत्ता व उपयोगिता याबाबत आलेल्या तक्रारींची जबाबदारी तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी यांचेवर राहील याची त्यांना जाणीव करुन देण्यात येत आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. या योजनेच्या निधीतील मृद संधारणाच्या कामाची तपासणी पर्यवेक्षकीय अधिका-यांनी आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. मृदस/मृद-तपासणी/1218/2017 पुणे दि. 13.7.2017 अन्वये वेळच्या वेळी करावी.

**इ) कामाचा आढावा**

या योजनेच्या कामाचा आढावा जिल्हास्तरावरील जिल्हा पाणलोट विकास समितीमार्फत दरमहा घेण्यात यावा.

**ई) प्रगती अहवाल**

या योजनेचा लाभार्थीनिहाय भौतिक/आर्थिक साध्याचा पाणलोटनिहाय प्रगती अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दरमहा 5 तारखेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने 7 तारखेस विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा.  विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने संकलीत पाणलोट निहाय/लाभार्थीनिहाय अहवाल दरमहा 10 तारखेस कृषि आयुक्तालयास सादर करावा. या योजनेच्या सर्व निधी स्त्रोतातून पूर्ण

झालेल्या कामांचा तपशील कृषि विभागाच्या (mahaagri.gov.in) या संकेतस्थळावर पाणलोट प्रकल्पासाठी (monitoring & evalution) या नावाने लिंक केलेल्या प्रणालीवर दरमहा नियमितपणे भरण्यात यावा.

**उ) इतर**

अ)सिमेंट नालाबांधाच्या जागा निवडीबाबत शासन निर्णय दिनांक 23/6/2017 च्या मागदर्शक सुचनेनुसार अंमलबजावणी करावी. तसेच परिच्छेद-ब मधील मुद्दा क्र. 2 नुसार पर्यवेक्षीय स्तरावरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना नेमून दिलेल्या तांत्रिक, वित्तीय व प्रशासकीय जबाबदा-या व कर्तव्ये प्रचलीत पध्दतीप्रमाणेच राहतील.

ब) या कामाची दखल प्रत्येक स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनिय अभिलेख लिहीतांना घेण्यात यावी. खर्चाचे नियोजन नसल्यामुळे निधी उपलब्ध असतांना देखील वर्षाचे कालावधीत समप्रमाणात खर्च केला जात नाही. परिणामी - बहुतांश निधी वर्षभर अखर्चित राहतो व वर्षाचे अखेरच्या कालावधीत शेवटच्या महिन्यात खर्च करण्यात येत असतो. यामुळे वित्तीय शिस्तीचे पालन केले जात नाही. तरी सन 2017-18 साठी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे. योग्य नियोजनाअभावी वर्षा अखेरिस देयके कोषागरात सादर केल्यामुळे देयके तपासणी व पारीत करणे याविषयी कोषागार यंत्रणेवर ताण पडतो व वेळे अभावी काही देयके सदोष असल्याने पारीत होत नाहीत. म्हणून निधी व्यपगत होत असतो. तरी वेळीच देयके सादर करण्याबाबत क्षेत्रीय सतरावर सुचना देण्यात याव्यात.

ड) या कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेला निधी याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक राहील.

इ)या योजनेअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिलेल्या कामांची गांवनिहाय/गटनिहाय/लाभार्थीनिहाय मंजूर यादी आयुक्तालयास सादर करावी.

**स्वाक्षरीत/-**
**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय म.रा. पुणे-411001**

-------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.मृदस/मा.सू.-2017-18/1765/मृद-4/2017
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-1 दि.19/9/2017

**प्रति,**

1) **विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**
2) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय म.रा. पुणे-411001**

**प्रत:- मा. प्रधान सचिव, जलसंधारण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मंुबई-32 यांना माहितीस्तव सादर**
**प्रत:-मा.विभागीय आयुक्त, सर्व यांना माहितीस्तव सादर.**
**प्रत:- मा.आयुक्त आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सादर.**
**प्रत:- मा.जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.**
**प्रत:- आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-1**

**सन 2017-18 मधील आदिवासी उपयोजना (TSP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनाअंतर्गत (OTSP)जिल्हानिहाय मंजूर तरतूद.रक्कम रू. ( लाख)**

| अ.क्र. | जिल्हा | मंजूर तरतूद | |
|---|---|---|---|
| | | टीएसपी | ओटीएसपी |
| 1 | ठाणे | 100.00 | 56.65 |
| 2 | रायगड | 24.00 | 41.00 |
| 3 | पालघर | 1137.96 | 10.63 |
| 4 | नाशिक | 1092.43 | 143.48 |
| 5 | धुळे | 515.98 | 0.00 |
| 6 | नंदूरबार | 800.00 | 0.00 |
| 7 | जळगाव | 100.00 | 0.00 |
| 8 | अहमदनगर | 75.03 | 19.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | पुणे | 60.00 | 20.00 |
| 10 | नांदेड | 69.07 | 100.00 |
| 11 | हिंगोली | 0.00 | 54.00 |
| 12 | बुलढाणा | 0.00 | 33.00 |
| 13 | अकोला | 0.00 | 53.52 |
| 14 | वाशिम | 0.00 | 32.22 |
| 15 | अमरावती | 193.60 | 0.00 |
| 14 | यवतमाळ | 318.29 | 95.78 |
| 15 | नागपूर | 0.00 | 54.75 |
| 16. | गोदिंया | 41.81 | 0.00 |
| 17. | चंद्रपूर | 336.68 | 30.00 |
| 18. | गडचिरोली | 276.58 | 0.00 |
| **एकूण** | | **5141.43** | **744.03** |